नियमित दरखास्त क्र.३९/२०१८
संतोष विरुद्ध मच्छींद्र

## नि. क्र. १७ वरील आदेश

डी. एच. यांनी सदरचा अर्ज डी. एच. संतोष रामचंद्र पाटील हे दिनांक २४.०२.२०२३ रोजी मयत झाल्याने, मयत डी. एच. यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी दाखल केला आहे.

२. डी. एच. यांचे असे कथन आहे की, दरखास्त मधील डी. एच. संतोष रामचंद्र पाटील हे दिनांक २४.०२.२०२३ रोजी मयत झालेले आहेत. सदर डी. एच. संतोष रामचंद्र पाटील यांस खालीलप्रमाणे वारस रेकॉर्डवर आणणेची विनंती केली आहे.

१. संतोष रामचंद्र पाटील (मयत)

| अ.क्र. | नाव | नाते |
|---|---|---|
| १/१ | श्रीमती वैशाली संतोष पाटील<br>व.व. ४२, धंदा – घरकाम<br>रा. कुची, ता. कवठेमहांकाळ, जि. सांगली | पत्नी |
| १/२ | रोहित संतोष पाटील<br>व.व. २३, धंदा – शिक्षण<br>रा. कुची, ता. कवठेमहांकाळ, जि. सांगली | मुलगा |
| १/३ | ओंकार संतोष पाटील<br>व.व. २१, धंदा – शिक्षण<br>रा. कुची, ता. कवठेमहांकाळ, जि. सांगली | मुलगा |

तरी सदर वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. सबब, अर्ज मंजूर करण्याची विनंती केलेली आहे.

३. डी. एच. यांच्या प्रस्तुतच्या अर्जावर जे. डी. यांनी म्हणणे दाखल केले नसल्याने प्रस्तुतचा अर्ज विना म्हणणे चालविण्यात आला.

४. दरखास्त व प्रस्तुतच्या अर्जाचे अवलोकन केले. डी. एच. यांच्या कथनाप्रमाणे अर्जदाराने मयत डी. एच. चे वारस अभिलेखावर घेण्याकामी परवानगी अर्ज दाखल केला आहे. वादीने प्रस्तुतची दरखास्त जे. डी. यांचे विरुध्द मौजे कुची येथे सि.स.नं. ७४० या जागेचा कब्जा मिळणेसाठी दाखल केलेली आहे. अशा परिस्थितीत मयत डी. एच. चे वारस अभिलेखावर असणे आवश्यक आहे.

५. सबब, वरिल बाबींचा विचार करता प्रस्तुतची दरखास्त गुणदोशावर निकाली काढण्याकामी मयत डी. एच. यांचे वारस अभिलेखावर असणे अत्यंत आवश्यक आहे. सबब खालील आदेश.

**आदेश**

१. अर्ज नि.क्र. १७ मंजुर करण्यात येत आहे.

२. मयत डी. एच. यांचे वारस अभिलेखावर घेण्यास परवानगी देण्यात येते.

३. अर्जदाराने विहीत मुदतीमध्ये आवश्यक ती पूर्तता करावी.

MAHESH ARVINDRAO KULKARNI

Digitally signed by MAHESH ARVINDRAO KULKARNI
Date: 2026.03.07 16:44:21 +0530

**कवठेमहांकाळ** **( एम. ए. कुलकर्णी )**

दिनांकः– ०७.०३.२०२६ सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कवठेमहांकाळ.

## Certificate

I affirm that the contents of this P.D.F. file judgment are same, word to word, as per the original order / judgment.

| | | |
|---|---|---|
| | | |
| Name of the Stenographer | : | Mrs. J. A. Salunkhe.<br>(Stenographar grade - III) |
| Court | : | Jt. C.J.J.D. and J.M.F.C.,<br>Kavathe Mahankal. |
| Date | : | 07.03.2026 |
| Order /judgment signed by P.O. on | : | 07.03.2026 |
| Order /judgment uploaded on | : | 07.03.2026 |